# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 12/01/2022 (बुधवार)
(सायंकाळ)

---

### निष्काळजीपणामुळे मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 9 कि. मी. अंतरावरील मौजा बोरखेडी येथे दिनांक 08/01/2022 ते 09/01/2022 चे 18.00 वा. ते 07.00 वा. दरम्यान मृतक/आरोपी नामे– दिपक राजु वाघधरे वय 32 वर्ष रा रिधोरा त काटोल जि नागपुर याने आपले मालकीचे शेतातील पिकाचे सौरक्षण करीता लोखंडी बारीक ताराचे कुंपणाला त्याचे शेतातुन गेलेल्या लो दाबाचे इलेक्ट्रीक जिवंत तारावर हुक टाकुन अनाधिकृत करंट लावले. सदर कृत्यामुळे एखादया व्यक्तीस दुखापत अथवा मृत्यु होण्याची शक्यता आहे याची त्याला जाणीव असतांना सुध्दा मृतक व्यक्तीने अनाधिकृतपणे त्याच्या शेताला लावल्याने लोखंडी ताराच्या कुंपणाला स्वताःच करंट लागुण मरण पावला. त्याचे मरणास तो स्वताच जबाबदार असल्याबाबत मर्ग चौकशी मध्ये निष्पन्न झाल्याने सदर गुन्हा नोद.

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ दिलीप इंगळे, पो.स्टे. कोंढाळी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 304 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री अजित कदम मो नं 9112994489 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर – दिनांक 10/01/2022 चे 23.30 वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री तेजराम मेश्राम मो.नं. 9075245059 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर